महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १५ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# राज ठाकरे प्रथमच मविआ नेत्यांसोबत !



अनेक वर्षानंतर शरद पवार मंत्रालयात!

महाविकास आघाडी आणि मनसे नेत्यांचं शिष्टमंडळ मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांच्या भेटीला

## महापालिका निवडणुका एकत्र लढणार असल्याची नांदी ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील प्रमुख विरोधी पक्षांनी आज मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेतली. विशेष म्हणजे यावेळी मनसे नेते राज ठाकरे देखील महाविकास आघाडीतील नेत्यांसोबत दिसले. राज ठाकरे यांची महाविकास आघाडीसोबतच्या नेत्यांशी ही जवळीक पाहून आता ठाकरे बंधू महापालिका निवडणूक एकत्र लढणार, अशा अटकळा बांधल्या जात आहेत. या बैठकीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, जितेंद्र आव्हाड, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, शिवसेना ठाकरे गटाचे अनिल देसाई, अनिल परब, शेकापचे जयंत पाटील आणि इतर नेते उपस्थित होते. या बैठकीत राज ठाकरे यांनी मतदार यादीतील गडबड, मतदान नोंदणी प्रक्रियेत विसंगती आणि निवडणुकीसाठी आयोगाची तयारी याबाबत प्रश्न उपस्थित केले. याबरोबरच, जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी 18 नोव्हेंबरला आयोगाला दिलेल्या पत्रातील मुद्द्यांवर लक्ष वेधले आणि खोट्या मतदार नोंदणीचा तपशील मागितला. बैठकीदरम्यान निवडणूक आयोगाच्या कामावर शंका व्यक्त केल्या. यात म्हटलं आहे की, आयोग खरोखर स्वायत्त आहे की नाही? लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत किती मतदार वगळले गेले, त्याचा तपशील का उपलब्ध नाही? मतदारांची नावे का काढली जातात आणि त्याचा पूर्ण तपशील संकेतस्थळावर का उपलब्ध नाही? मतदार यादीवर अभ्यास करणे प्रत्येक पक्षाचा हक्क आहे. परंतु, ते लपवण्यात काही राजकीय हेतू किंवा दबाव आहे का? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती विरोधी पक्षातील नेत्यांनी निवडणूक आयोगावर केली. या बैठकीत विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मतदार यादीतील विसंगती आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी आयोगाने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली.

## लक्षवेधी

### कल्याण आगारात चोरट्यांचा सुळसुळाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील राज्य परिवहन महामंडळाचे एस. टी. बस आगार, बाजुचा वल्लीपीर रस्ता भुरट्या चोरट्यांचे आश्रयस्थान झाले आहे. दररोज बस आगारातील ज्येष्ठ महिला प्रवाशांच्या हातामधील सोन्याच्या बांगड्या, प्रवाशांच्या हातामधील मोबाईल चोरण्याचे प्रमाण वाढले आहे. सोमवारी संध्याकाळी एका प्रवाशाचा महागडा मोबाईल चोरट्यांनी लांबवला. आपला महागडा मोबाईल गायब होताच, अस्वस्थ झालेल्या कल्याण पूर्वेतील चक्कीनाका चेतन हायस्कूल परिसरात राहणाऱ्या संतोष साळवे या नागरिकाने कल्याणहून वाशीकडे जाणाऱ्या वातानुकूलित बसला धावपळ करत रोखून धरले. घटनास्थळी पोलिसांना पाचारण केले. बसमध्ये कोणी प्रवासी चोरटा आहे का याची खातरजमा केली. चोरट्यांनी संतोष यांचा मोबाईल चोरून पलायन केले होते. त्यामुळे महागडा मोबाईल हाती लागला नाही. दिवाळी सण, मे महिन्याच्या सुट्टीच्या काळात कल्याण रेल्वे स्थानक, एस. टी. बस आगारात प्रवाशांची गर्दी असते. या कालावधीत अनेक प्रवासी हातात, गळ्यात सोन्याचा ऐवज परिधान करून प्रवास करतात. अशा ऐवज घातलेल्या ६० वर्षावरील महिला, पुरूष प्रवाशांना लक्ष्य करून भुरटे चोरटे बसमध्ये प्रवासी म्हणून चढताना ऐवज असलेल्या प्रवाशाच्या हातामधील, गळ्यातील सोन्याचा ऐवज लांबून पसार होतात. मागील अनेक वर्षापासूनचा हा प्रकार आहे. एसटीचे अधिकारी, तेथील सुरक्षा अधिकारी याविषयी उदासीन असल्याने प्रवाशांना त्याचा फटका बसतो.

### अंबरनाथ नाट्यगृहाला बाळ कोल्हटकरांचे नाव ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** अंबरनाथ शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या आणि लवकरच लोकार्पण होऊ घातलेल्या भव्य नाट्यगृहाला कै. बाळ कोल्हटकर या लोकप्रिय आणि यशस्वी नाटककार, दिग्दर्शक, नाट्यनिर्माते आणि अभिनेते यांचे नाव द्यावे अशी मागणी त्यांची मुलगी भाषा अमरेंद्र फाटक यांनी केली आहे. बाळ कोल्हटकरांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्त महाराष्ट्र सरकारने त्याचे नाव द्यावे अशी मागणी करणारे निवेदनही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना दिले आहे.

बाळ कोल्हटकर यांचा जन्म २५ सप्टेंबर १९२६ रोजी सातारा येथे झाला असला तरी त्यांचे १९६० ते १९७२ या काळात अंबरनाथ येथे वास्तव्य होते. तेव्हा त्यांनी त्यांच्या काही गाजलेल्या नाटकांची निर्मिती पूर्ण केली होती. शासनाने त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभ म्हणून एक सांस्कृतिक कार्यक्रम सातारा येथे फेब्रुवारी २०२५ मध्ये केला होता. त्यामुळे बाळ कोल्हटरकरांचे नाव नाट्यगृहाला द्यावे अशी मागणी सर्वप्रथम अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि अंबरनाथ नगर परिषदेला केली होती. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनीही फाटक यांच्यासह यासाठी डॉ. श्रीकांत शिंदे यांना निवेदन दिले होते. जिल्ह्यातील इतर भाजप आमदारांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला होता, अशी माहिती फाटक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

### डोंबिवली स्थानकात आज विशेष ब्लॉक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मध्य रेलवेवरील डोंबिवली स्थानकावर १२ मीटर रुंद पादचारी पुलासाठी (एफओबी) तुळ्या उभारण्यात येणार आहेत. यासाठी मध्य रेल्वेच्या अप आणि डाऊन जलद मार्गावर आणि पाचव्या-सहाव्या मार्गावर विशेष ब्लॉक घेण्यात येईल.

हा ब्लॉक आज बुधवारी रात्री १२.२० ते ३.२० दरम्यान असेल. ब्लॉक कालावधीत लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक विस्कळीत होईल. दिवा - कल्याणदरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गिकवर बुधवारी रात्री १२.२० ते ३.२० दरम्यान तीन तासांचा, अप आणि डाऊन जलद मार्गावर रात्री १.२० ते ३.२० दरम्यान दोन तासांचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत गाडी क्रमांक ११०४१, २२८६५ आणि २२५३८ दिवा -कल्याण दरम्यान डाऊन जलद मार्गावर धावतील. अप दिशेकडे जाणारी गाडी क्रमांक ११०२० आणि १८५१९ कल्याण पनवेल विभागामार्गे वळवण्यात येतील आणि कल्याण प्रवाशांना उतरवण्यासाठी पनवेल आणि ठाणे येथे थांबा दिला जाईल. गाडी क्रमांक २२१०४ कल्याण येथे २५ मिनिटे थांबवण्यात येईल. गाडी क्रमांक १२१०२ कल्याण येथे २० मिनिटांसाठी थांबवण्यात येईल.

# केडीएमसी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

## २० हजार रुपयांचा बोनस ■ परिवहन कर्मचारी कामगार संघटनेची माहिती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना यावर्षी दिवाळीत २० हजार रुपये बोनस मिळणार असल्याची माहिती परिवहन कर्मचारी कामगार संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी दिली आहे. दरवर्षी केडीएमसी कर्मचाऱ्यांना महापालिकेकडून बोनस दिला जातो. यावर्षी २५ हजार रुपये बोनस देण्यात यावा अशी मागणी संघटनेच्या वतीने केडीएमसी आयुक्तांकडे करण्यात आली होती. या मागणीवर मंगळवारी आयुक्त अभिनव गोयल यांच्यासोबत संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी चर्चा केली. गेल्यावर्षी १९ हजार ५०० रुपये बोनस दिला गेला होता. यंदा कामगार संघटनेच्या मागणीनुसार २५ हजार रुपये बोनस देता येणार नाही. त्यामुळे यंदा मागच्या वर्षीच्या तुलनेत बोसनमध्ये ५०० रुपयांची वाढ करुन प्रत्येक कर्मचाऱ्याला २० हजार रुपये बोनस दिला जाणार असल्याचे आयुक्तांनी मान्य केले आहे. महापालिका कर्मचारी, परिवहन कर्मचारी आणि शिक्षक अशा एकूण ६ हजार ५०० जणांना या बोनसचा लाभ मिळणार आहे.



# लोकलची 'लेट-लतिफी'

## बदलापूर स्थानकात प्रवाशांमध्ये संतापाची लाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** दररोज लोकल विलंबामुळे नोकदार वर्गाला फटका बसत असतानाच मंगळवारी बदलापूर रेल्वे स्थानकात सकाळी ७ वाजून १४ मिनिटांनी खोपोलीहून येणारी मुंबई लोकल विलंबाने आल्याने एकच गोंधळ उडाला. या लोकलपूर्वी एका एक्सप्रेस गाडीला सोडण्यात आल्याने ही लोकल तब्बल ४० मिनिटे उशिराने आल्याचा आरोप प्रवाशांनी केली. त्यामुळे आधीच अरूंद असणाऱ्या बदलापूर स्थानकातील फटालांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे लोकल गर्दीन गच्च भरून जात होत्या. त्यामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला. गेल्या काही दिवसांपासून कर्जत स्थानकात सुरू असलेल्या रूळांच्या सुसुत्रिकरणाच्या कामामुळे कर्जतकडे जाणाऱ्या लोकल गाड्यांचे वेळापत्रक बिघडले आहे. त्यामुळे दोनच दिवसांपूर्वी मध्यरात्री १२च्या सुमारास रेल्वे प्रवाशांनी बदलापूर स्थानकातील फलाट क्रमांक तीनवरील स्थानक व्यवस्थापकांच्या कार्यालयाबाहेर गर्दी केली होती.

कर्जतच्या दिशेला जाणाऱ्या लोकलच नसल्याने महिला प्रवाशांनी व्यवस्थापकांच्या कार्यालयात घेराव घातला होता. त्यानतंर बदलापूर स्थानकात आलेली बदलापूर लोकल पुढे नेण्यात आली. त्यानंतर सोमवारी पुन्हा लोकल विलंबाने आल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

# ठाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप आरक्षण अधिसूचनेची प्रत प्रसिद्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.14 :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 (सन 1962 चा अधिनियम, 5) च्या तरतुदी अन्वये ठाणे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणातील एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच स्त्रियांकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण स्त्रियांसह) राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या क्र./ जिकाठा/ सा.शा / जिपपंस /आरक्षण /2025, दि. 14 ऑक्टोबर 2025 च्या प्रारुप आरक्षणाची अधिसूचनेची प्रत खाली दर्शविलेल्या ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली असून मसुदा ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडून त्या आदेशात नमूद केल्यानुसार दि.14 ऑक्टोबर 2025 नंतर विचारात घेण्यात येईल. प्रारुप आरक्षणाची अधिसूचनेची प्रत 1. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालयातील फलकावर, 2. जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील फलकावर, 3. तहसिलदार शहापूर / मुरबाड / कल्याण / भिवंडी / अंबरनाथ यांच्या कार्यालयातील फलकावर व 4. पंचायत समिती शहापूर / मुरबाड / कल्याण / भिवंडी / अंबरनाथ कार्यालयातील फलकावर या ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आदेशाच्या मसुद्यास कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची जी सकारण लेखी निवेदने /हरकती/ सूचना जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे दि.17 ऑक्टोबर 2025 पर्यंत सादर करावेत. या तारखेनंतर जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे आलेली निवेदने हरकती/सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालयातून कळविण्यात आले आहे.






# शहापूर आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर उलगुलान मोर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) व डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) शहापूर तालुका कमिटी या संघटनेच्या वतीने आश्रम शाळा व वसतिगृहे यांच्या विविध मागण्यांसाठी शहापूर आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर उलगुलान मोर्चा काढण्यात येणार आहे.

शहापूर आदिवासी विकास प्रकल्पतर्गत येणाऱ्या शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी तालुक्यातील असलेल्या आश्रम शाळा, वसतिगृहे व एकलव्य निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. या वसतिगृहामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अनेक सोयी सुविधा बंद केलेल्या आहेत तर काही सुविधा असूनही दिल्या जात नाहीत असे दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे.

दरम्यान, आदिवासी विद्यार्थ्यांच्या या समस्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने या असलेल्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी गुरुवार दि. 16 ऑक्टोबर रोजी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) व डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) या संघटनेच्या शहापूर तालुका कमिटी वतीने प्रकल्प कार्यालयावर उलगुलान मोर्चा काढण्यात येणार असल्याचे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया संघटनेचे ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष भास्कर म्हसे यांनी म्हटले आहे.

# दिवाळी निमित्त साखर, रवा, मैद्याचे वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** वामन म्हात्रे प्रतिष्ठानतर्फे दिवाळी निमित्त लोकोपयोगी साखर, रवा, मैदा वाटप उपक्रमाचे भव्य आयोजन गरीबाचावाडा, डोंबिवली पश्चिम येथे करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानचे प्रमुख शिवसेना डोंबिवली उपशहरप्रमुख गोरखनाथ म्हात्रे आणि माजी नगरसेविका कविता म्हात्रे, युवासेना डोंबिवली उपशहर अध्यक्ष अनमोल म्हात्रे, समाजसेविका अश्विनी म्हात्रे, माजी स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे, माजी नगरसेविका कविता म्हात्रे, रसिका पाटील आणि संदेश पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी आमदार राजेश मोरे यांच्याहस्ते साखर, रवा, मैद्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मिहिला जिल्हा संपर्क संघटक कविता गावंड आणि केतकी पवार यांसह इतर अनेक मान्यवर शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

तसेच या उपक्रमात खास आकर्षण म्हणजे 1000 लाडक्या बहिणींसाठी लकी ड्रॉ तसेच भावांसाठी 500 लकी ड्रॉ चे आयोजन करून दिवाळीच्या उत्सवाला बंधुभावाचा आणि आनंदाचा अनोखा स्पर्श देण्यात आला. साखर, रवा आणि मैद्याचे वाटप करून नागरिकांच्या घरगुती गरजांची पूर्तता करण्यात आली. या उपक्रमाचे मोठ्या उत्साहात स्वागत करत, या उपक्रमाद्वारे दिवाळीत प्रत्येक घरात माणुसकीचा आणि आनंदाचा दिवा पेटविण्याचा प्रयत्न आयोजकांच्या माध्यमातून करण्यात आला.

रायगड जिल्ह्यात

# सरळसेवेतील लिपिक टंकलेखकांची भरती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट क) एकूण 72 पदाकरीता फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांपैकी 01 पद हे अपंग संवर्गातून किमान 40 टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारामधून दिव्यांगत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्ये व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येईल. याकरिता रायगड जिल्ह्यातील पात्र माजी सैनिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.), यांनी केले आहे.

ही भरती प्रक्रिया टिसीएस आयओएन यांच्यामार्फत होणार आहे. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवारांना वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in, या संकेतस्थळावर (Resources Tab ---> Recruitment Tab) येथे दि.14 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून दि. 05 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी 23.59 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

# जागतिक विद्यार्थी दिन



**डॉ . एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी जागतिक विद्यार्थी दिन साजरा केला जातो. ते भारताचे ११ वे राष्ट्रपती, एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि एक उत्साही शिक्षक होते ज्यांनी विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन आणि प्रेरणा दिली.**

15 ऑक्टोबर हा दिवस अनेक पद्धतींनी खास आहे. एक म्हणजे हा 'जागतिक विद्यार्थी दिन' आहे, 'वाचन प्रेरणा दिन' म्हणूनही हा दिन साजरा केला जातो. आणि हाच दिवस भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन आहे. खरंतर दरवर्षी हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जातो. हा दिवस समाज आणि भविष्य यांना आकार देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतो. जाणून घेऊयात या दिवसाचे महत्त्व आणि इतिहास.

**का साजरा करतात जागतिक विद्यार्थी दिन ?**

भारताचे पूर्व राष्ट्रपती आणि प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती स्मरणार्थ 15 ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. कलामांनी नेहमीच शिक्षणाला पाठिंबा दिला. जर आपल्याला राष्ट्राचा विकास साधायचा असेल तर तरुणांच्या मनातील इच्छा, त्यांच्या कल्पना यांना ;प्रोत्साहन द्यायला हवे यावर त्यांचा विश्वास होता. डॉ. कलामांना विज्ञान आणि तंत्रज्ञान, विशेषत: क्षेपणास्त्र निर्मितीच्या क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ओळखले जायचे.

ते अनेकदा शाळा आणि कॉलेजमधील मुलांना भेटी द्यायचे. त्यांच्या लक्ष्याबद्दल बोलायचे आणि मुलांना त्यांच्या पूर्ण क्षमतांचा वापर करण्यासाठी प्रेरित करायचे. त्यांनी असं म्हटलं की शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक विकास या दोघांसाठीही अत्यंत गरजेचं आहे.

**विद्यार्थी दिनाचा उद्देश:**

विद्यार्थी हा भविष्यातील नेता आणि परिवर्तन निर्माता आहे. जो एक सुंदर आणि आधुनिक जग तयार करू शकतो.

हा दिवस साजरा करुन आपण डॉ. अब्दुल कलामांच्या याच विश्वासाचा सन्मान करत असतो.

**विद्यार्थी दिन का गरजेचा ?**

विद्यार्थी दिन अनेक कारणांमुळे साजरा केला जातो. हा दिवस विद्यार्थ्यांचा सन्मान करतो. एपीजे अब्दुल कलाम यांची आठवण काढण्यासाठी आणि सध्याच्या घडीला शिक्षणाच्या आव्हानांच्या बाबतीत जागरुकता वाढवण्यासाठी हा दिन साजरा केला जातो. हा दिवस विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात येणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी आणि आपल्या शिक्षणसंस्थेमध्ये असणाऱ्या कमतरता दूर करण्यासाठी एक संधी देते.

**जागतिक विद्यार्थी दिवसाचे महत्त्वः**

**विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या प्रगतीवर देशाच्या विकासाचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे त्यांना समर्पित असा एक दिवस असायला हवा. म्हणूनच अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त विद्यार्थी दिवस साजरा करण्यात येतो. विद्यार्थ्यांना महत्त्व देणे आणि त्यांचे समाजातील महत्त्व जाणणे हे या दिवसाचे उद्दिष्ट आहे. या दिवशी डॉ. एपीजे अब्दुल कलाम आणि त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी कथा विद्यार्थ्यांना सांगून प्रेरित केले जाते. कलाम यांच्या आयुष्यातील बरेच काही शिकण्यासारखे आहे. त्यामुळेच या दिवसानिमित्त ते शिकण्याची संधी विद्यार्थ्यांनी दवडू नये.**



# मुरबाड टि.डी.सी.बँकेत जिन्यावरुन पडुन वृद्ध महिला जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



> **बँकेसाठी ग्राहक हि देवता आहे. याचा विचार करून ग्राहकांचे सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे हि संचालक मंडळाची जबाबदारी आहे**
> **-सुनिल भेरे.शाखा व्यवस्थापक मुरबाड.**

**मुरबाड :** ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुरबाड शाखेत दोन दिवसांपूर्वी एका वृद्धाला जिन्यावरुन ढकलुन देऊन जखमी करत लुटल्याची घटना ताजी असतानाच, सोमवारी विमल तुंगार वय ६५ मु.आंबेळे हि महिला जिन्यावरून पडुन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असुन, ती मुरबाड ग्रामिण रुग्णालयात उपचार घेत असल्याने बँकेतील ग्राहकांच्या सूरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने ग्राहकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले.

मुरबाड तालुक्यातील २०६ गावांसह शहरी ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना आपले आर्थिक व्यवहार करण्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हि एकमेव बँक असल्याने या बँकेत सरकारी नोकरदार,पेन्शनर, शेतकरी व लाडक्या बहिणीसह हजारो नागरिकांची खाती आहेत. मात्र या बँकेत प्रवेश करण्यासाठी शेकडो पायऱ्यांवर चढ उतार करावी लागत असल्याने काही वृध्द व आजारी खातेदारांना धाप लागणे, चक्कर येऊन पडते अशा घटना नेहमीच घडत असतात. असे असताना वयोवृद्ध ग्राहकांवर शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास कृष्णा रांजणे वय वर्षं साठ हे आपल्या खात्यातून पैसे काढून लोखंडी जिना उतरत असताना एका लुटारू ने त्यांना धक्का देत. खाली पाडले ते जखमी अवस्थेत खाली पडलेले असताना त्या लुटारुने त्यांचे हातातील पिशवी घेऊन पलायन केले.हि घटना ताजी असतानाच सोमवारी सकाळी विमल तुंगार या ६५ वर्षाच्या आजी बँकेत आल्या असता त्या कोसळुन खाली पडल्या आणि गंभीर जखमी झाल्या बँकेतील कर्मचाऱ्यांनी विमल तुंगार यांना मुरबाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करुन नातेवाईकांना कळविले आहे.

या घटनेमुळे मुरबाड टि.डी.सी बँकेतील ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असुन सुरक्षितता उपाय म्हणुन या बँकेत लिफ्ट बसवावी किंवा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावी. अन्यथा वाढत्या घटनांमुळे ग्राहक बँकेतील खाती बंद करण्याचा विचार करतील.

# बांधकाम ठेकेदारामुळे आदिवासींना अशुद्ध पाणीपुरवठा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**झिडके-अंबाडी:** भिवंडी तालुक्यातील मौजे-खंबाळा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील आदिवासी वस्तीतीमध्ये रस्त्याचे खोदकाम करणाऱ्या ठेकेदाराकडून आदिवासी वस्तीतील पाणीपुरवठा पाईप लाईन तोडल्याने सदर पाईप लाईन मधून अशुद्ध व गाळयुक्त गढूळ पाणीपुरवठा होऊ लागला. त्यामुळेच या ठिकाणी पिण्याचे व दैनंदिन वापरातील पाणीपुरवठ्याचा दुसरा काहीच पर्याय उपलब्ध नसल्याने येथील लोकवस्तीतील रहिवाशांना अशुद्ध व गाळयुक्त गढूळ पाणी वापरायची वेळ आली.याबाबत सदर आदिवासी वस्तीतील संतप्त रहिवाशांनी गढूळ पाण्याने भरलेला हंडा व कळशी डोक्यावर घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात आपला मोर्चा काढला.व आपल्या मागण्या मान्य झाल्याखेरीज येथून हटणार नाही अशी आक्रमक भूमिका मोर्चेकऱ्यांनी घेतल्यावर ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी पडघा पोलीस यांना पाचारण करून,संबंधित बाबतीत बांधकाम ठेकेदाराकडून झालेल्या अन्यायाबाबत माहिती दिली असता,पोलिसांनी वस्तुस्थिती पाहून सदर आदिवासी वस्तीतील पाणीप्रश्न व त्याबाबत तात्काळ पर्याय व्यवस्था करावी अन्यथा ठेकेदार म्हणून आपल्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल असे स्पष्ट सांगितल्यानंतर ठेकेदाराकडून सदर आदिवासी वस्तीतीसाठी फुटलेल्या पाईप लाईनची दुरूस्ती होईपर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची हमी घेतल्यावर मोर्चेकरी यांनी सरपंच समक्ष लेखी घेऊन आपली समजूतीची भूमिका घेऊन आपल्या प्रश्नाची सोडवणूक केली.

सदर मोर्चामध्ये आदिवासी वस्तीतील विनोद गावीत,महेश भूरकूड,काकरी जाधव,अनिल बरफ,गुलाब मोरे,गीता वळवी,अलिशा बरफ आदि रहिवाशांचा सहभाग होता.त्यांना या अन्यायकारक घटनेबाबत मार्गदर्शन जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पार्वती पवार,शेवंती पासारी यांचे लाभले. या अन्यायकारक घटनास्थळी विशेष दखल घेण्यासाठी श्रमजीवी संघटनेचे भिवंडी तालुका सचिव-विश्वनाथ पासारी उपस्थित राहून,मोर्चेकरी यांना सक्रीय पाठिंबा व योग्य न्याय मिळवून देण्याच्या कामी आपली भूमिका पार पाडली.

# बाळगंगा नदी पत्रात उतरून प्रकल्पग्रस्तांचा जल सत्याग्रह

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** पेण तालुक्यातील बाळगंगा धरणाला 2009 साली सुरुवात झाली असून सद्या धरणाचे 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे परंतु 17 वर्षे होऊन सुद्धा बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचे आजही प्रश्न प्रलंबितच आहेत 'आधी पुनर्वसन मग धरण' असा कायदा असताना देखील सरकारने धरणाचे काम सुरू केले; परंतु जावळी, करोटी, निफाड, वरसई, वाशिवली, गागोदे खुर्द या सहा ग्रामपंचायतीसह 9 महसूली गावे आणि 13 आदिवासी वाड्यांमधील सन 2011 च्या संकलनुसार 3443 प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन अजून केलेले नाही. उच्च न्यायालय यांच्या दिनांक 11 जानेवारी 2024 च्या बाळगंगा निवाडा संपादन प्रक्रिया रद्द करून दिलेल्या आदेशान्वये भूमी संपादन कायदा 2013 नुसार नव्याने भूसंपादन प्रक्रिया करणे, जमिनीला सरसकट भाव व पुनर्वसन तसेच अन्य मागण्या पुर्ण होत नसल्याने सत्यशोधक सर्वोदय संघटनेचे संघटक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली बालगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आज वरसई येथे बाळगंगा नदीपात्रात उतरून बाळगंगा जल सत्याग्रह आंदोलन केले.या आंदोलन मध्ये शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलन स्थळी मोठा पोलीस फौज फाटा व अग्निशमन दलाची गाडी तैनात करण्यात आली होती,

जल सत्याग्रह आंदोलन स्थळी पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल,महसूल विभागाचे मंडळ अधिकारी किरण जुईकर यांनी भेट दिली शेवटी पेण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी विनंती केल्याने बालगंगा प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनास तुर्तास स्थगिती दिली.

गेली अनेक वर्ष प्रकल्पग्रस्त शेतकरी विविध आंदोलन करून सुद्धा त्याच्या मागण्या मान्य होत नसल्याने ते आज नदी पात्रात उतरून जल सत्याग्रह आंदोलन केले या आंदोलनाला शेतकरी कामगार पक्ष, वंचित आघाड, कॉंग्रेस पक्ष, अन्य संघटना यांनी जल सत्याग्रह आंदोलनास पाठिबा दर्शवला.

> गेली 2009 पासुन शासनाने आमचे पुनर्वसन करायला घेतले आहे परंतु आज पर्यत पुनर्वसन झाले नाही येथील भूमिपुत्रांना व शेतकऱ्यांना सरसकट भावा मिळावा अशा अन्य मागण्यासाठी बालगंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी नदी पात्रात उतरून आंदोलन केल आहे जो पर्यत शासन भूमिपुत्रांचा प्रश्न सोडवत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहील
> **- प्रकल्पग्रस्त शेतकरी**

> आम्हाला जल सत्याग्रहाच्या माध्यमातून सरकारला सांगायचं आहे की आमच्या जमिनीला सरसकट भाव देत नसला व योग्य पुनर्वसन करत नसाल तर आमच्या जमिनीवरील शिक्का काढून आमचे सात बारा कोरा करावा असा इशारा जल सत्याग्रह च्या आंदोलन मधून देत आहोत जर शासनाने हिवाळी अधिवेशनाच्या आगोदर मागण्या सोडवल्या नाहीत तर यापेक्षा मोठा आंदोलन करू.
> **- संदीप पाटील ,सामाजिक कार्यकर्ते**

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
व्यवसायात चांगला नफा मिळेल. आज जमीन किंवा घर खरेदी करण्याची शक्यता आहे. तुम्हाला मोठ्या कंपनीत नोकरीची संधी मिळेल.

**वृषभ**
सामाजिक कार्यात तुमची प्रतिमा मजबूत होईल. तुम्ही आज एखादा प्रकल्प सुरू करू शकता, ज्यामुळे भविष्यात तुम्हाला महत्त्वपूर्ण फायदे मिळतील.

**मिथुन**
जर तुम्ही खरेदीसाठी जाण्याचा विचार करत असाल तर प्रथम वस्तूंची यादी बनवा.नवीन रोजगाराच्या संधींचा शोध घ्याल.ताजेतवाने वाटेल.

**कर्क**
तुम्ही उत्तम प्रकारे पार पाडाल. आज तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाल, ज्यामुळे तुमचे मन शांत होईल. इतरांशी बोलताना तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवा.

**सिंह**
तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. कोणत्याही प्रयत्नात तुमच्या पालकांकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**कन्या**
व्यवसायात तुम्हाला चांगला नफा मिळेल, परंतु खर्च जास्त असू शकतो, म्हणून सावधगिरी बाळगा. तुम्हाला नोकरीच्या बदलीची बातमी मिळू शकते.

**तूळ**
तुमची सर्व कामे वेळेवर पूर्ण करू शकाल. मित्रांच्या मदतीने, उत्पन्नाच्या संधी मिळतील ज्यामुळे फायदा होईल आणि आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**वृश्चिक**
मुलांना तुमच्या कामात मदत करताना पाहून तुम्हाला आनंद होईल. तुम्ही कोणतेही काम पूर्ण समर्पणाने पूर्ण कराल, ज्यामुळे तुम्हाला यश मिळेल.

**धनु**
ऑफिसमध्ये आदर वाढेल आणि कनिष्ठ तुमच्याकडून प्रेरित होतील. तुमचे कौटुंबिक वातावरण शांत असेल, ज्यामुळे आनंद मिळेल.

**मकर**
तुमच्या वैवाहिक जीवनात सुसंवाद राहील आणि तुमची आर्थिक परिस्थिती देखील चांगली असेल.मुले आज तुमचे विचार तुमच्याशी शेअर करू शकतात.

**कुंभ**
काही महत्त्वाचे वैयक्तिक निर्णय घेऊ शकता, ज्याचे परिणाम भविष्यात जाणवतील. तुमच्यावर काही कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील सोपवल्या जातील.

**मीन**
व्यवसाय सुरू करण्याचा विचार करू शकता आणि वडिलांकडून सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल.आज कोणत्याही विषयावर जास्त विचार करणे टाळा.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# एसटीतून आवडेल तेथे प्रवास स्वस्त!

## दिवाळीत परिवहन महामंडळाने तिकीट दर कपात केल्याने दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आता लवकरच शाळेला दिवाळीची सुट्टी लागणार असून मुंबईकरांना आपल्या गावाची ओढ लागणार आहे. त्याच्यात एसटी महामंडळाने तिकीट दर कपात केल्याने दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एस.टी.) 'आवडेल तेथे कोठेही प्रवास' या योजनेअंतर्गत चार दिवस तसेच सात दिवस पासचे दर वाढविले होते. मात्र, प्रवाशांची मागणी लक्षात घेता सदर योजनेचे दर कमी करण्यात आले असून, महामंडळाने नवीन दरपत्रक जाहीर केले आहे. एसटी महामंडळाने २४ जानेवारीपासून विविध बससेवांच्या प्रतिटप्पा दरात वाढ केली होती. नवीन टप्पा दरपत्रकाप्रमाणे 'आवडेल तेथे कोठेही प्रवास' या योजनेअंतर्गत दर १ फेब्रुवारी २०२५ पासून सुधारित करण्यात आले होते. या दरवाढीमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी होती. प्रवाशांनी पासचे दर कमी करण्याबाबत मागणी केली होती. या मागणीची गंभीर दखल घेऊन महामंडळाने मंगळवार, ७ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून दर कमी केले आहे.

### ■ काय आहे आवडेल तेथे प्रवास योजना ?

७ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून एसटीने दर कमी केले, एसटी महामंडळाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार राज्यात 'आवडेल तेथे कोठेही प्रवास' योजना जाहीर केली आहे. या योजनेमुळे कोठेही एसटीने स्वस्त भाड्यात प्रवास करता येणार आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने यापूर्वी एसटी महामंडळाला 30 टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची परवानगी दिली होती. त्यानुसार जानेवारी 2025 पासून सुमारे 15 टक्के वाढ लागू करण्यात आली होती. तसेच दिवाळी सुट्ट्यांच्या काळात अतिरिक्त 10 टक्के हंगामी दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता महामंडळाने ही दरवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

'आवडेल तेथे प्रवास' योजनेअंतर्गत एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा थेट फायदा होईल.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक आरोग्य विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या पशु वैद्यकीय विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सर्व सुविधा ऑनलाईन प्रणालीद्वारे करणेकरिता ऑनलाईन प्रणालीची निर्मिती करण्यासाठी ऑनलाईन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatender.gov.in येथे दि.१५/१०/२०२५ ते दि. २९/१०/२०२५ पर्यत सकाळी ११.०० वाजेपर्यत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दि.२९/१०/२०२५ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/७३८/२०२५-२६
दि:१४.१०.२०२५

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका,ठाणे

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

अनधिकृत बांधकामाला आळा घाला..
अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !

# दिवाळीच्या निमित्ताने मतांची पोळी भाजण्यासाठी इच्छूकांमध्ये चुरस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. १४ (बातमीदार)** दिवाळीचा सण जवळ येताच नवी मुंबईत राजकीय वातावरणही अधिक तापू लागले आहे. महापालिका निवडणुकीच्या हालचालींना वेग आला असून, नव्या प्रभागरचना आणि आरक्षण सोडतीच्या प्रतीक्षेत अनेक इच्छुक उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध कार्यक्रमांचा धडाका लावला आहे. सणाचा आनंद आणि राजकीय स्पर्धा या दोन्हींचा संगम शहरात दिसू लागला आहे.

दिवाळीच्या निमित्ताने उमेदवारांकडून महिला मंडळे, युवक संघटना, ज्येष्ठ नागरिक संघ, रहिवासी संघटना अशा सर्व घटकांशी संपर्क साधण्याचे नियोजन सुरू आहे. काही ठिकाणी दिवाळी फराळ समारंभ, आकाशकंदील व रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, वयोवृद्ध सन्मान सोहळे, तसेच 'दिवाळी पहाट' सारखे सांस्कृतिक उपक्रम आयोजित करून उमेदवार स्वतःची उपस्थिती दाखवत आहेत. अनेकांनी मिठाईच्या बॉक्सपासून सजावटीचे साहित्य आणि भेटवस्तू देऊन मतदारांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपसारख्या सोशल मीडियावरदेखील राजकीय शुभेच्छा संदेशांची रेलचेल वाढली आहे. काही ठिकाणी शुभेच्छांच्या नावाखाली प्रचार संदेश देण्यात येत असून, सणासुदीच्या शुभेच्छा बॅनर आणि पोस्टरचा अक्षरशः पूर शहरभर दिसू लागला आहे. सत्ताधारी पक्ष असो वा विरोधक, दोघेही मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी कसून प्रयत्न करत आहेत. सणाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या जनसंपर्क मोहिमा आगामी निवडणुकीच्या तयारीचा एक भाग मानल्या जात आहेत. दिवाळीच्या प्रकाशात झगमगणारे शहर आता राजकीय रंगातही न्हाऊन निघाले आहे, मात्र या चमकदार मोहिमांमध्ये कोण खऱ्या अर्थाने सेवाभाव दाखवते, यावर मतदारांचे लक्ष केंद्रित आहे.

# वसई-विरार शहर कोंडीच्या कचाट्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई, ता. १४ :** वसई-विरार शहर कोंडीच्या कचाट्यात सापडत आहे. वाहतूक व्यवस्था कोलमडत असल्याने प्रवासी त्रासले आहेत. वाहनांच्या प्रचंड रांगा, कामावर जाण्यास आणि घरी येण्यास उशीर, इच्छितस्थळी पोहोचण्यास येणारी अडचण डोकेदुखी ठरू लागली आहे. या समस्यांना कुणी वाली आहे का, असा सवाल सुजाण नागरिकांतून व्यक्त केला जात आहे.

विरार उड्डाणपूल, नारिंगी, चंदनसार, माणिकपूर, सातिवली, वालीव, वसई फाटा, तुळिंज, संतोष भुवन, औद्योगिक वसाहतीकडे जाणारे मार्ग यासह शहरातील अंतर्गत मार्गावर कोंडी होऊ लागली आहे. वसई पूर्वेला मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहत आहे. हजारोंच्या संख्येने चाकरमानी, मालवाहतूक करणारी अवजड वाहनांची वर्दळ असते, परंतु इच्छितस्थळी जाण्यासाठी विलंब होतो. एकीकडे रस्ते रुंदीकरण, दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, तरीही कोंडीचा विळखा घट्ट होत आहे.

वसई-विरार शहरात कोंडीची समस्या डोके वर काढत आहे. त्यामुळे याबाबत उपाययोजना करून नागरिकांना कोंडीमुक्त करा आणि मोकळा श्वास घेत प्रवास करू द्या, अशी मागणी होऊ लागली आहे. याबाबत प्रशासन कोणती कार्यवाही करणार, याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

**फेरीबोटीसाठीही रांगा**

वसई, नालासोपारा आणि विरार येथील वाहनचालक शहरांतर्गत व महामार्गावर कोंडी असल्याने वसई गावात वाहने घेऊन रो-रो फेरी बोटीचा आधार घेत आहेत, परंतु तिथेदेखील रांगा लागत आहेत. त्यामुळे वसई ते भाईंदर प्रवास करण्यासाठी वाट पाहत थांबावे लागत आहे.

रस्ते मार्गाचा वापर करून प्रवासी हे ये-जा करत असतात, परंतु शहरातील नागरिकांना कोंडीचा सामना करावा लागत आहे. गेले तीन दिवस वाहतूक कोंडीची समस्या जैसे थे परिस्थितीत असल्याने प्रवास करायचा तरी कसा, असा सवाल नागरिकांतून निर्माण होऊ लागला आहे. रुग्णांना ने-आण करणाऱ्या रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने, डॉक्टरांच्या वाहनांनादेखील वाट मिळत नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी, जि. ठाणे

पाणी पुरवठा विभाग

ई - निवीदा सुचना क्रमांक ३५ (पहिल्यांदा प्रसिध्दी) सन २०२५-२६

खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप अंदाजित खर्च निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | मा. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ भिवंडी (पश्चिम) मतदारसंघातील टोरेंट ऑफिस ओसवालवाडी ते नॉर्दर्न पेट्रोल पंप परिसरामध्ये पाण्याची पाईपलाईन टाकणे बाबत. अंदाजित खर्च : रु. १९,९९,४०१/- निविदा फॉर्म फी : रु. २३६०/- | दि. १५/१०/२०२५ ते दि. २४/१०/२०२५ |

सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक १५/१०/२०२५ पासुन उपलब्ध आहे.

जावक क्रमांक :
भिनिशमनपा/जसंवि/1164
दि. 14/10/2025

सही/-
कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी

# महापालिका रुग्णालयातून पाठवलेल्या रुग्णास प्रवेश नाकारला?

## मनसेकडून फोर्टिस विरोधात कायदेशीर कारवाईचा इशारा !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. १४ : नवी मुंबईतील फोर्टिस हॉस्पिटल यांनी नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयातून अधिकृतपणे पाठवलेल्या गंभीर रुग्णास मध्यरात्रीच्या सुमारास प्रवेश नाकारल्याची घटना घडली. या प्रकारामुळे रुग्णाचा जीव धोक्यात आला होता. नवी मुंबईतील सशक्त सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर थेट आघात करणाऱ्या या प्रकारावर मनसे निषेध व्यक्त करत, रुग्णालय प्रशासनाला कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.**

५ सप्टेंबर रोजी रुग्ण गणेश फसे यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना नवी मुंबई पालिका रुग्णालयातून फोर्टिस हॉस्पिटलला अधिकृत रेफर करण्यात आले, मात्र ६ सप्टेंबरच्या मध्यरात्री रुग्णाला फोर्टिसमध्ये दाखल करण्यासाठी नेण्यात आले, तेव्हा हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी आयसीयू बेड उपलब्ध असूनही, नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालय रेफर रुग्णांना रात्री प्रवेश दिला जात नाही, असे सांगत थेट नकार दिला. उलटपक्षी, जर खासगी रुग्ण म्हणून भरती करायचे असेल, तर तत्काळ ८० हजार रुपये भरावे



लागतील, अशी मागणी केली गेली. ही बाब फोर्टिस हॉस्पिटल व नवी मुंबई महानगरपालिका यांच्यात झालेल्या कराराचे स्पष्ट उल्लंघन आहे.

या करारानुसार फोर्टिस हॉस्पिटलने कोणत्याही क्षणी १५ खाटांपर्यंत नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयातील रेफर रुग्णांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. त्या दिवशी केवळ ११ रुग्ण दाखल होते, म्हणजेच किमान चार बेड उपलब्ध असतानादेखील रुग्णाला नाकारण्यात आले. या घटनेनंतर मनसे विभाग अध्यक्ष व राज ठाकरे वैद्यकीय सेवा कक्ष सदस्य, सागर विचारे यांनी २२ सप्टेंबर रोजी फोर्टिस हॉस्पिटलला लेखी निवेदन दिले. निवेदनामध्ये त्यांनी प्रशासनाला सात दिवसांची मुदत देऊन स्पष्ट उत्तर व कारवाईची मागणी केली होती, परंतु त्या पत्राला १५ दिवस उलटूनसुद्धा कोणतेही लेखी उत्तर देण्यात आलेले नाही.

**■ कायदेशीर कारवाईचा इशारा**

या प्रकारामुळे मनसेने थेट मैदानात उतरत, फोर्टिस हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारासमोर माहितीफलक लावले आहेत. या फलकांवर पालिका रुग्णालय रेफर रुग्णांसाठी मदतीची गरज असल्यास मनसेशी संपर्क साधावा, असे स्पष्ट लिहिले आहे. रुग्णालय प्रशासनाने तातडीने सुधारणा केल्या नाहीत, तर पालिका, आरोग्य विभाग व पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात येईल, न्यायालयीन स्तरावर करारभंग, निष्काळजीपणा व फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशाराही मनसेने दिला आहे.

# कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात बेकायदा वाहनतळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागातील साधना हॉटेल ते आर्चिस गृहसंकुल, ओक बाग ते बस आगार दरम्यानच्या सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजुला विविध भागातील नागरिक आपली खासगी वाहने आणून उभी करत आहेत. हे रस्ते अरूंद असल्याने एखादे मोठे वाहन या भागात आले की या भागात वाहतूक कोंडी होते. शाळेच्या बस या कोंडीत अडकल्या की मुलांचे हाल होतात, अशा तक्रारी आर्चिस संकुल भागातील नागरिक, व्यापाऱ्यांनी केल्या. या भागातील नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या करण्यात आलेल्या वाहन मालकांवर कारवाई करण्याची मागणी वाहतूक पोलिसांकडे केली. वाहतूक पोलिसांनी काही दिवस या भागात गस्त घातली. पण, संबंधित वाहन चालक आपले ऐकत नसल्याची धक्कादायक उत्तरे वाहतूक पोलिसांनी स्थानिक रहिवाशांना दिली. एखादे वाहन नियमबाह्यपणे दररोज रस्त्याच्या कडेला उभे करून ते वाहतुकीला अडथळा ठरत असेल तर त्या वाहनावर वाहतूक पोलिसांनी दंडात्मक आणि आरटीओच्या साहाय्याने जप्तीची कारवाई करण्याची नागरिकांची मागणी आहे. तसे अधिकार आरटीओ आणि वाहतूक विभागाला आहेत. डोंबिवलीत अशा कारवाया नियमितपणे सुरू आहेत.

ही वाहने अनेक दिवस एकाच जागी उभी राहत असल्याने दररोज या भागात स्वच्छता करण्यासाठी येणाऱ्या पालिकेच्या सफाई कामगारांना या भागात दररोज स्वच्छता करता येत नाही. वारा आला की या वाहनांखालील कचरा उडून रस्त्यावर येतो. भटके श्वान या वाहनांचा आधार घेऊन या भागात तळ ठोकतात. रात्रीच्या वेळेत हे भटके श्वान पादचाऱ्यांच्या अंगावर, दुचाकी स्वारांच्या पाठीमागे धावतात, असे स्थानिक रहिवाशांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# फटाके विक्रेत्यांसाठी परवाने बंधनकारक

## भिवंडी महापालिकेचे विक्रेत्यांना स्पष्ट निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 10.10.2025 रोजी सन 2025 च्या दिवाळी सणाकरिता करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठक पार पडली.

या बैठकीसाठी मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (परवाना) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, सहायक आयुक्त (परवाना) श्री. नितीन पाटील, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 1 श्री. मकसूम शेख, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 2 श्री. माणिक जाधव, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 3 श्री. सुरेंद्र भोईर, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 4 श्री. गिरीष घोष्टेकर, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 5 श्री. सईद चिवणे, परवाना विभाग प्रमुख श्री. स्नेहल पुण्यार्थी, अग्निशमन प्रमुख श्री. नितीन चव्हाण उपस्थित होते.

या बैठकीमध्ये मा. आयुक्तांनी निर्देश दिले आहेत की, या वर्षी सर्व फटाके विक्रेत्यांची दुकाने ही 1) छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगण, भादवड, 2) शंकर कमटम बिल्डींग पद्मानगर येथील मैदान, 3) काटेकर मैदान, कामतघर 4) छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील नझराना सिनेमाचे मोकळे मैदान या महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणीच लावली जातील. तसेच या विक्रेत्यांनी महानगरपालिकेकडून परवाना, अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला, टोरेंट पॉवर कंपनीकडील तात्पुरते विद्युत जोडणी प्रमाणपत्र इ. आवश्यक परवाने घेतल्याशिवाय त्यांनी फटाके विक्री करु नयेत. तसेच कुठेही रस्त्यावर, हातगाडीवर फटाके विक्री करता येणार नाही. जे विक्रेते विना परवानगी अथवा निश्चित केलेल्या जागेशिवाय अन्यत्र फटाके विक्री करताना आढळल्यास त्यांचेकडील सर्व सामुग्री (फटाके) जप्त करुन ते नष्ट करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

### फटाके विक्रेत्यांकरिता एक खिडकी योजना

"फटाके विक्रेत्यांकरिता महानगरपालिकेने एक खिडकी योजना महानगरपालिकेच्या मुख्यालयात तळमजल्यावर सुरू केली असून त्याकरिता दोन स्वतंत्र कर्मचारी देखील नियुक्त करण्यात आल्याची माहिती आयुक्तांनी दिली आहे. सर्व फटाके विक्रेत्यांनी या एक खिडकी योजनेमार्फत सर्व परवाने प्राप्त करुन घेण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे. तसेच सर्व फटाके विक्रेत्यांनी त्यांच्या दुकानात निर्माण होणारा सर्व कचरा जमा करण्याकरिता कचऱ्याचा डब्बा अथवा पिशवीची व्यवस्था करुन त्यामध्ये कचरा जमा करावा. रस्त्यावर इतरत्र कोठेही कचरा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. भिवंडी शहरातील सर्व नागरीकांनी पर्यावरणपुरक व प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. अशी माहिती महापालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दैनिक ठाणे जीवनदीपला दिली.

# नविन पे बिल प्रक्रियेमुळे शिक्षकांच्या वेतनास विलंब

## दिवाळीनंतर प्रक्रिया राबवण्याची अनिल बोरनारे यांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई (प्रतिनिधी)**

शालार्थ प्रणालीमध्ये 'संचमान्यता' प्रणालीशी जोडलेल्या नवीन पे-बिल प्रक्रियेमुळे दिवाळीपूर्वी होणाऱ्या वेतनात अडथळे येण्याची शक्यता असल्याने, सदर प्रक्रिया दिवाळीनंतर लागू करण्याची मागणी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व मुंबई मुख्याध्यापक संघटने उत्तर विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे याबाबत अनिल बोरनारे यांनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना निवेदन पाठवून ही मागणी केली आहे शालेय शिक्षण विभागामार्फत 'शालार्थ' प्रणालीमध्ये पे-बिल पुढे पाठवण्यासाठी 'संचमान्यता' प्रणालीशी जोडलेली नवीन प्रक्रिया अलीकडेच लागू करण्यात आली आहे.

या प्रक्रियेनुसार, पे-बिल पुढील स्तरावर पाठवताना प्रणाली आपोआप 'संचमान्यता' मधील मंजूर पदे आणि पे-बिलमधील कर्मचाऱ्यांची संख्या तपासत आहे. जर पदांची संख्या जुळली नाही तर बिल थांबते व शिक्षण अधिकारी कार्यालयाकडे विशेष मंजुरीसाठी पाठवावे लागते. शालार्थाच्या अशा प्रक्रियेमुळे राज्यातील अनेक शाळांचे वेतन देयके अडकले असून, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिवाळीपूर्वी वेतन होईल की नाही यात शंका निर्माण झाली आहे शिक्षकांचे वेतन दिवाळीपूर्वी व्हावे यासाठी ही प्रक्रिया तातडीने स्थगित करून दिवाळीपूर्वी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन जुन्या पद्धतीनुसार तात्काळ अदा करण्यात यावे अशी मागणी अनिल बोरनारे यांनी केली आहे

# ठाणे ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत शस्त्रसाठा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहापूर येथे ठाणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने एकाकडून शस्त्रसाठा जप्त केला. दिलावर शेख (४५) असे अटकेत असलेल्या आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याकडून गावठी बनावटीचे पिस्तुल आणि एक काडतुस जप्त केले. ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी तसेच अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी ठाणे ग्रामीण क्षेत्रातील फरार आरोपी, अवैध शस्त्रास्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथके तैनात करण्यात आली होती.

# मुरबाड तालुक्यातील चासोळे नदीवरील पुलाची दुरावस्था!

## सावित्री पुलाची पुनरावृत्ती होण्याची भिती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ **मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील प्रस्तावित काळू धरणाला लागून असलेल्या चासोळे नदीवरील पुलाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पुलाच्या वरचा स्लॅब निघून गेल्याने आतील लोखंडी सळया दिसत आहेत.याच रस्त्याने चासोळे,आंबिवली,खुटल,न्याहाडी,मेर्दी व इतर २० गावांमध्ये नागरिकांना याच पुलावरून जातांना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. या पुलाला संरक्षण कठडा देखील नसल्याने या पुलावरून दोन वाहने जातांना खाली उतरून पहावे लागत असल्याने या पुलाची तात्काळ दुरुस्ती व्हावी अशी मागणी चासोळे व या परिसरातील नागरिक करत आहेत.

चासोळे पुलाला अनेक वर्ष कठडे न बांधल्यामुळे या पुलावरून अनेक मोटारसायकल स्वारांचे पडून अपघात झाल्याची घटना घडली असून हा दिवाळीचा सण संपल्या नंतर बांधकाम करण्यात यावे अशी मागणी पोलीस मित्र मानधिकारी संघटना दिल्ली ठाणे जिल्हा अध्यक्ष राजेश भांगे यांनी केली आहे.दरम्यान तालुक्यातील न्याहाडी, टोकावडे हेदवली या पुलांची देखील दुरूस्ती व्हावी अशी मागणी गेले कित्येक दिवस होत आहे मात्र प्रशासन एखाद्या मोठ्या अपघाता नंतरच जागे होणार आहे का असा प्रश्न येथिल नागरिक करत आहेत.

# गावठी पिस्तुलासह एका आरोपीस अटक

## वासिंद गुन्हे शाखेची धडक कारवाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पेट्रोलिंग सुरू असताना मुंबई- आग्रा महामार्गावरील चेरपोली येथील बाबाचा धाब्यासमोरील मैदानात फिरणाऱ्या एका संशयीताला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी केली असता त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्तूल व एक जिवंत काडतुस मिळून आल्याने त्यास लागलीच अटक करण्यात आली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी एस स्वामी अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी ठाणे ग्रामीणमध्ये अवैद्य धंदे अग्निशस्त्र याबाबत कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले होते त्यानुसार वासिंद गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळी पथके तयार केली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार मुंबई आग्रा महामार्गावरील चेरपोली येथील बाबाच्या धाब्यासमोरील मैदानात दिलनवाज उर्फ दिलावर मोहम्मद शेख वय (45) वर्ष राहणार वाफे हा संशयास्पद आढळून आल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी केली असता त्याच्याकडे शस्त्र परवाना नसतानाही एक गावठी बनावटीचे पिस्तूल व एक जिवंत काडतुस असा एकूण 51 हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला जिल्हाधिकारी ठाणे यांच्या मनाई आदेशाचा भंग केल्याने त्याला ताब्यात घेऊन शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 338 /2025 भारतीय हत्यार कायदा कलम 3,25 महाराष्ट्र पोलीस अधीक्षक चे कलम 37 (1)(3)135 प्रमाणे गुन्हा दाखल केला या गुन्ह्याचा अधिक तपास शहापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवकुमार जाधव करीत आहेत.

सदरच्या या घटनेची कार्यवाही ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी एस स्वामी अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कदम भाऊसाहेब गायकवाड दीपेश किणी सहाय्यक फौजदार प्रकाश साहिल पोलीस हवालदार संतोष सुर्वे, गोविंद कोळी, स्वप्निल बोडके या पथकाने उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे पुढील गुन्ह्याचा तपास शहापूर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

# प्रकाश गवारी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : श्रीरंग विद्यालय मराठी माध्यमिक विभागातील सहाय्यक शिक्षक प्रकाश गवारी यांनी शिक्षण क्षेत्रात 30 वर्ष निष्ठेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. सुशिक्षित, संस्कारी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. त्यांच्या योगदानामुळे शिक्षणक्षेत्रात आदर्श निर्माण झाला असून विविध स्पर्धा, प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञशिक्षक म्हणून केलेल्या कामामुळे समाज जीवनातही प्रेरणादायी उदाहरण घडले आहे. त्यामुळे विविध पुरस्काराने सुद्धा सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याचे दखल घेऊन मान्यवरांच्या हस्ते प्रकाश गवारी सर यांना शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस शिक्षक सेलच्या वतीन रविवार दि.12 ऑक्टोबर 2025 रोजी कॉंग्रेस कमिटी प्रदेश कार्यालय, दादर, मुंबई येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे शिक्षक आमदार जयंतजी आसगावकर, शिक्षक सेल अध्यक्ष प्रा. प्रकाशजी सोनवणे, कार्यकारी अध्यक्ष प्रकाशजी तायडे, आयोजन समिती व समन्वय समितीचे अध्यक्ष सचिन दुर्गाडी (पुणे), समन्वयक प्रा. यशराज पारखी (पुणे), प्रदेश उपाध्यक्ष अमर पाटील, रविकांत आपटे, सामवेल मावची सह शिक्षक, मुख्याध्यापक उपस्थित होते.

प्रकाश गवारी सर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेमुळे श्रीरंग शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तुषार देसाई, सचिव नमिता निंबाळकर मॅडम, कोषाध्यक्ष महेश भोसले, पदाधिकारी गणेश लाखोडे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक नितीन तावडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, सहकारी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्त कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




**सुशिक्षित, संस्कारी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. त्यांच्या योगदानामुळे शिक्षणक्षेत्रात आदर्श निर्माण झाला असून विविध स्पर्धा, प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञशिक्षक म्हणून केलेल्या कामामुळे समाज जीवनातही प्रेरणादायी उदाहरण घडले आहे.**

# जेएसडब्ल्यू प्रदूषणाविरोधात पेण प्रांत कार्यालयावर मोर्चा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : जेएसडब्ल्यू कंपनीने हवा, पाणी, जल याठिकाणी होणारे प्रदूषण बंद करावे, या मागणीसाठी पेण प्रांत कार्यालयावर गडब, डोलवी, कासू, पांडापूर, वडखळ स्थानिक प्रदूषणविरोधी कृती समितीतर्फे सोमवारी जनमोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख विष्णू पाटील, माजी सभापती संजय जांभळे, के. पी. पाटील, संदीप म्हात्रे, ॲड तन्मय पाटील, जीवन पाटील संदीप कडू, कल्पेश पाटील, ॲड. रोशन पाटील यांच्यासह प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

जेएसडब्ल्यू कंपनीने हवेतील, पाण्यातील आणि शेतजमीनीतील होणारे प्रदूषण कमी करावे अन्यथा आम्ही कायदेशीर मार्गाचा अवलंब करू, असा निर्धार मोर्चेकरांनी यावेळी व्यक्त केला.त्यानंतर मोर्चेकरांच्या वतीने प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन महाराष्ट्र प्रदूषण बोर्डाकडे पाठवणार असल्याचे प्रांत अधिकाऱ्यांनी सांगितले. कंपनीने प्रदूषण थांबवावे, अन्यथा गेट रोको, रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख विष्णू पाटील यांनी यावेळी दिला.यावेळी या आंदोलनात राजाराम पाटील पेण तालुकसंपर्क कांचन पाटील दिनेश घरत अमित टावरे नामदेव पिंगलस्कर मोरेश्वर तांबोली

तुलशीदास गायकर,धमेंद्र तांबोली, विनोद म्हात्रे चंद्रहास म्हात्रे ना.म.शिंदे नरेंद्र तांडेल कमळाकर मोकल प्रसाद म्हात्रे पंढरीनाथ पटील महेश नागे आदी शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भोंडल्याच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती

## शिवसेना कल्याण पूर्व महिला आघाडी शहरशाखेचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शासनाच्या माध्यमातून महिलांसाठी आणि सर्व सामान्य नागरिकांसाठी विविध योजना सुरु असून या योजनांची माहिती शिवसेनच्या वतीने भोंडल्याच्या माध्यमातून महिलांना देण्यात आली. शिवसेना कल्याण पूर्व महिला आघाडी शहरशाखेच्या वतीने महिलांसाठी महाभोंडला हळदी-कुंकू कार्यक्रम व वेशभूषा स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन कल्याण पूर्वेतील कशिश हॉटेल येथे करण्यात आले होते. कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, महिला आघाडी जिल्हा प्रमुख छाया वाघमारे, शिवसेना कल्याण पूर्व शहर प्रमुख निलेश शिंदे यांच्या नेत्तृत्वाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी वैशाली लांडगे, मीना वाळेकर, मालती पवार, मनीषा भानुशाली, नेहा शेट्टी, अनिता लव्हटे, चिकनकर, राधिका कुलकर्णी, दीपाली तेलुरे आदी शिवसेना महिला पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते. महिला जिल्हा प्रमुख छाया वाघमारे, पुष्पा ठाकरे, राधिका गुप्ते, माधुरी काळे, राजवंती मढवी, सारिका जाधव, पल्लवी बांदोडकर, संगीता गायकवाड आदी महिला पदाधिकार्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. तर शहर प्रमुख निलेश शिंदे, माजी नगरसेवक मल्लेश शेट्टी, नवीन गवळी, रमाकांत देवळेकर, हर्षवर्धन पालांडे यांसह सर्व महिला उपशहर प्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. यावेळी महिलांनी पारंपारिक भोंडला गाणी, हळदी-कुंकू विधी आणि वेशभूषा प्रदर्शनाद्वारे सांस्कृतिक विविधता प्रदर्शित केली. वेशभूषा स्पर्धेतील विशेष आकर्षण म्हणजे "केळंबा देवी खरोशी मंदिर" या थीमवर आधारित वेशभूषा करण्यात आली. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील पेण जवळील खरोशी गावात असलेल्या केळंबा देवी मंदिरापासून प्रेरित पोशाख होते, जे देवीच्या एका अद्वितीय रूपाला समर्पित आहे. कार्यक्रमाच्या शेवटी, विजेत्यांना स्मृतिचिन्हे आणि भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच, उपस्थित असलेल्या सर्व महिलांना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडून दिवाळी भेट म्हणून पैठणी साड्या देण्यात आल्या, ज्यामुळे महिलांचा आनंद द्विगुणीत झाला.

# मुरबाडमध्ये शिवसेना शिंदे गटाचा महामेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका समोर ठेवून मुरबाड तालुका शिवसेना शिंदे पक्षाचा महामेळावा सोमवारी संध्याकाळी मुरबाड येथिल कुणबी समाज भवन येथे कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला. तालुक्यातील पक्ष संघटनेला मजबुती यावी व कार्यकर्तामध्ये उत्साह वाढावा यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी मेळाव्याला संबोधित करताना एकनाथ शिंदे अडीज वर्ष मुख्यमंत्री असताना अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. राज्यातील अडीज कोटी महिलांना लाडक्या बहिणीचा लाभ दिला.आजही शिंदे साहेब जनतेसाठी दिवस रात्र काम करत आहेत. संकट काळात धाऊन जाणारे एकमेव नेते अशी ओळख राज्यात आहे.शेतकऱ्यांच्या पाठीशी शिंदे साहेब व शिवसेना असून शेतकऱ्यांना मोठी मदत केली आहे. विधानसभेत 80 पैकी 60 आमदार निवडून आणलेत ही शिवसेनेची ताकद आहे त्यामुळे येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायतमितीवर भगवा फडकेल असा विश्वास व्यक्त करत कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले.




**दिवस रात्र काम करणारे एकनाथ शिंदे एकमेव नेते - खा.श्रीकांत शिंदे**

यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, निलेश सांबरे, अरविंद मोरे, एकनाथ शेलार, आप्पा यशवंतराव,सुदाम पाटील यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका प्रमुख कांतीलाल क़ंटे यांनी केले तर महामेळाव्याचे उत्तम नियोजन तालुका संपर्क प्रमुख संतोष जाधव यांनी केले होते. यावेळी भारतीय सैन्यात लेप्टनंट पदावर भरती झालेल्या मुरबाडची कन्या शामली जाधव हिच्या आईचा सन्मान श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.मेळाव्याला लाडक्या बहिणींची उपस्थिती लक्षणीय होती. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. हेमंत झुंजारराव यांनी केले.

# कोकण विभागीय लोकशाही दिनी 04 अर्ज प्राप्त


दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली.यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या 06 असून आज आलेल्या अर्जांची संख्या 04 आहे, असे एकूण प्राप्त अर्ज 10 होते. त्यापैकी 01अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आता कोंकण विभागीय स्तरावर 01 अर्ज प्रलंबित आहेत.

# संजय बनसोड यांना "माता सावित्री-फातिमा समाजभूषण" पुरस्कार जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ग्रंथालय चळवळ पुढे नेऊन मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे, पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते व सशक्त मस्तक कोणासमोर डोळे झाकून नतमस्तक होत नाही. आयुष्याला कलाटणी देण्याची ताकद वाचनालयात आहे. प्रसन्न मनासाठी, थकवा घालविण्यासाठी, ध्येय ठरविण्यासाठी वाचन आवश्यक आहे. वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी युवकांसमोर नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाची त्यांची धडपड असते. या विचारासाठी महाराष्ट्रभर संजय बनसोड यांनी प्रॅक्टिकल वर्कशॉप च्या माध्यमातून 31 कार्यशाळा



घेऊन आधुनिक डिजिटल ग्रंथालय मुलुंड येथे सुरू केले आहे. या मौलिक कार्याची दखल घेऊन वाचनालयाचे अध्यक्ष के.ए. सय्यद सर यांनी मनमिळावू स्वभाव, गरजूंना मदतीचा ध्यास असलेले मुंबई उपनगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड यांची माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कारासाठी निवड केली आहे. दि. 19 ऑक्टोबर 2025 रोजी सायंकाळी सात वाजता बाळासाहेब ठाकरे सभागृह कुर्ला येथे संजय बनसोड यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती वाचनालयाचे सल्लागार प्राचार्य सुनील पाटील यांनी दिली आहे.

# कॅग द्वारे महाराष्ट्रातील सर्व सरकारी विभागांचे लेखापरीक्षण करा : राष्ट्रवादीची मागणी

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांचे पत्र**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : केंद्रीय नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) द्वारे महाराष्ट्रातील सर्व सरकारी विभागांचे जनहित लेखापरीक्षण करून ती माहिती सार्वजनिक माहितीसाठी पोर्टलवर उपलब्ध करून देण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक के. संजय मूर्ती यांना पत्र दिले आहे.

महाराष्ट्रातील जनता नागरी विकास प्रशासन विभागासारख्या बहुतेक सरकारी विभागांमधील भ्रष्टाचारामुळे त्रस्त आणि त्रस्त आहे, ज्यामध्ये सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका समाविष्ट आहेत. या महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे नागरिकांना स्वच्छ पाणी, आरोग्यसेवा, रस्ते इत्यादी मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. ज्या भ्रष्टाचारामुळे महानगरपालिका जनतेला पुरवू शकत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागातील भ्रष्टाचारामुळे महाराष्ट्रातील बहुतेक रस्ते खराब स्थितीत आहेत. खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहन चालवणे कठीण होत आहे आणि सामान्य माणूस गोंधळून जातो. आरोग्य विभाग, वीज विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि इतर काही प्रशासकीय विभागांमध्ये भ्रष्टाचार पसरला आहे.

महाराष्ट्रातील लोक त्यांच्या कष्टाचे पैसे कराच्या स्वरूपात सरकारला देतात. त्या बदल्यात, सरकार आणि प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे की त्यांनी आज सामान्य नागरिक ज्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत त्या प्रामाणिकपणे पुरवल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील अशा घोटाळयांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी महाराष्ट्र विधानसभेची अंदाज समितीची देखील आहे, परंतु काही कारणास्तव, महाराष्ट्र विधानसभेची अंदाज समिती या बाबींकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप साळवे यांनी केला आहे. त्यामुळे भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक आणि महाराष्ट्र विधानसभेची अंदाज समिती वरील बाबींची सखोल चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि ही सर्व माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्याची मागणी नोवेल साळवे यांनी केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई । नवी मुंबई । ठाणे । पालघर । रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024